# दलित स्त्रियांच्या आत्मकथनातील सामाजिकता संदर्भ 'जिंण आमुचा' आत्मकथन

**जयसिंग बाबुराव दिंडे** संशोधक विध्यार्थी , मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

---

**प्रस्तावना :**

"दलित आत्मकथन म्हणजे दलितांच्या वेदनांचे आलेख आहेत. दलित आत्मकथनांचे एक प्रमुख वैशिष्टय म्हणजे स्वत:च्यागतकाळातील घडलेल्या महत्वाच्या बारीक सारीक घटनाही लेखक कथनकरीत असतो. आणि या घटना व प्रसंग ज्या प्रदेशात घडतात, त्याप्रदेशाचेही नकळत दर्शन घडते. त्यामुळे दलित आत्मकथनातूनच येणारे स्त्री-पुरूष प्रादेशिक वैशिष्टयांनी युक्त असतात. भाषा, रितीरिवाज, रूढीपरंपरा,जगण्याची पध्दत यातून तेथील जीवनाची ओळख करून देतात.या अनुषंगाने बेबी कांबळे यांचे 'जिंण आमुचा' या आत्मकथनातून दलित सामाजिकतेचे विवेचन केले आहे.

**उद्देश :** १. दलित आत्मकथनातील बेबी कांबळे यांचा परिचय अभ्यासने

२.बेबी कांबळे यांच्या'जिंण आमुचा' आत्मकथनातील सामाजिक चित्रण अभ्यासने

३. .बेबी कांबळे यांच्या'जिंण आमुचा' आत्मकथनातील पुरुषसत्ता संस्कृतीचा अभ्यासने

**विषय प्रवेश :**

जिणं आमुचं' हे बेबीताई कांबळे यांचे आत्मचरित्र असले तरी खऱ्या अर्थाने पन्नास वर्षापूर्वीच्या पश्चिम महाराष्ट्रातील एका खेडेगावातील महार समाजाचे चित्रण हा या पुस्तकाचा गाभा आहे. १९८६ मध्ये पुस्तकरूपात त्याचे प्रकाशन करण्यात आले. हे आत्मचरित्र केवळ बेबीताई यांचे आत्मचरित्र नसून ते तत्कालीन महार समाजाचे सामूहिक आत्मकथन आहे. बेबीताई यामध्ये त्यांच्या वैयक्तिक आयुष्यापेक्षा समाजातील दुःख, दारिद्र, प्रथा, परंपरा, परिवर्तन याविषयी बोलताना दिसतात म्हणूनच या आत्मचरित्रास एक सामूहिक स्वर प्राप्त झाला आहे. हे आत्मकथन मासिकातून भागशः प्रसिध्द झाल्याने अवघ्या अकरा प्रकरणांच आहे. बेबी कांबळे यांच्या वालपणीच्या आठवणींचा, आंबेडकरांच्या विचारांचा आणि लेखिकेने वेळोवेळी केलेल्या भाष्यांचा संग्रह आहे. या आठवणीतही लेखिका प्रमुख व्यक्ती नाही. या आठवणी व्यक्तीकेंद्री नसून एखादया समाजशास्त्राच्या पुस्तकातील वर्णनात्मक लेखांप्रमाणे आहेत.

पश्चिम महाराष्ट्रातल्या एका खेडेगावातल्या महार समाजाचे चित्र हा पुस्तकाचा खरा गाभा आहे. दलित स्त्रीचे मराठीतले पहिले आत्मचरित्र म्हणून बेबीताईंच्या पुस्तकाला ऐतिहासिक महत्त्व आहे. समाजशास्त्रज्ञाचा पिंड असलेल्या लेखिकेला लहानपणापासून समाजजीवनाचे निरीक्षण बारकाईने करण्याचा नाद होता. बेबीताईनी आपल्याआत्मकथनामध्ये वैयक्तिक आठवणींपेक्षा समाजचित्रणावर जास्त भर दिला आहे.त्यांचे वयाच्या १३ व्या वर्षीच त्यांचे लग्न झाले. सासरही फलटणमध्येच होते. त्यामुळेच त्यांनी तिथे किराणा मालाचे दुकान टाकले. हळूहळूदुकान चांगले चालू लागले . दोघेही नवरा वायको रात्रदिवस दुकानात कष्टकरत होते . लहानपणापासूनच त्यांना वाचनाची आवड असल्याकारणाने त्यागिऱ्हाईक नसतील तेव्हा फावल्या वेळात ती पुस्तक वाचून काढीत. यातून त्यान लेखनाची प्रेरणा मिळाली. यावेळी त्यांनी आत्मकथानात आपल्या लग्नाचे विवेचन कमी करून समाजातील लग्न विषयीचे वर्णन बेबीताईनी बारीकसारीक तपशीलासह केले आहे.

बेबी कांबळे यांनी आत्मकथनात महार समाजातील लोकांना समजाव्यवस्थातील रूढी, सवर्णानी लावलेले नियम त्यांच्या अंगवळणी पडलेली असून त्यांना ते तोडणे अशक्य होते. "केवळ जिवंत राहण्यासाठी कष्ट इतकेअपरंपार की तन मन धन गावाच्या इतकं आधिन की या विरूध्द बंड करणं,बंडाचा विचार करणंही अशक्य. वेदनेची सवयच जणू या समाजालालागलेली.घराचे सोवळे जपणाऱ्या ब्राम्हण स्त्रीला महारणी म्हणत."आम्ही काय येडयाबिडया हाय व्हय घर इटाळायला! तुमीदेवादिकाची माणसं आमाला काय कळना व्हय. देवधरम बाटवाय?"( कांबळे, (१९८६) : ५४ )मढयाचं कापड मिळाल्यावर ते लुगडयासारखं नेसून आनंदानेबागडणारी महाराची पोर कोण व्हायची तर ब्राहमणीणी. इतर मुलींना मग तीब्राहमणांच्या थाटात बोलायची,"अग ये महारणी लांब उभी रहा. शिवताशिवत करू नका. विटाळव्हल. सोदिच्यानू, आमचं देवधर्म बाटतील." (कांबळे (१९८६) : ७९ ) अशाप्रकारे 'जिणं आमुचं' मधून कांबळे यांनी पन्नास वर्षापूर्वीची रूढआणि परंपरा चे आपल्या आत्मकथनात विवेचन करून त्यांनी आजूबाजूल घडत असललेल्या घटनांचे बारकाईने स्पष्टीकरण केले आहे.

महार समाजाला रस्त्यावर चालताना मोकळीक नसत. सार्वजनिक रस्ता सवर्णान लोकांच्या ताब्यात असून दलित समाजाला चालताना मान घालून चालत जावे लागे. असे विदारक चित्र आत्मकथनात मांडले आहेत.दलित समजा हा अत्यंत गलिच्छ जीवन जगात होता. याला त्या काळातील सामाजिक रूढी कारणीभूत होती तसेच उच्चवर्णियांनीच त्यान

तसे राहण्यास भाग पडले होते. त्यांना कोणतीही जाणीव होऊ न देता हेच तुमचे जगणे आहे असे त्याच्या मानावार उच्च वर्णीयांनी बिबवले होते.

अशा प्रकारे रूढींचे पालन हा दलितांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता. वर्णव्यवस्थेच्या वरवंट्याखाली दबल्या गेल्यामुळे अज्ञानी दलित समाज अंधश्रद्धेखाली जखडला गेला होता. या अंधश्रद्धेपोटी तो अनेक परंपरांचे पालन, अनुकरणत होता. परंपरापालनात बुद्धिपेक्षा भावना वरचढ असते व या भावनेच्या आधिन झालेला माणूस देवधर्मांच्या भ्रामक समजुतीपायी कर्मकांडाच्या आहारी जातो. याचे चित्रण आत्मकथनांत केले आहे.

**सारांश :**

लित आत्मकथनातून स्त्री जीवन चित्रित झालेले आहे. परंतु 'जिणं आमुचं' हे एका दलित स्त्रीने लिहिलेले आत्मकथनअसल्याकारणाने यातून एक स्त्री म्हणून व दलित स्त्री म्हणून अशा दुहेरी भूमिकेतून वाट्याला आलेले दुःख अतिशय प्रभावीपणे मांडले आहे. याआत्मकथनात बेबीताई कांबळे यांनी आत्मशोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. स्वार्थी, धर्मांध, कर्मठ सनातन्यांनी स्वतः साठी केलेली ही योजना बनवाबनवी वाटते. दलित माणसाच्या कपाळावर दारिद्र्य, अज्ञान, अस्पृश्यता इ. लिहिणारी अलिखित सत्य नसून त्यात बदल करता येतो.

**संदर्भ सूची :**

१.निंबाळकर वामन , "दलित साहित्य स्वरूप व भूमिका ", प्रबोधन प्रकाशन, नागपूर , पृ.१०७

२.कुलकर्णी (डॉ.) आरती - दलित स्वकथने - साहित्यरूप विजय प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर.

३.कांबळे बेबी, "'जिंण आमुचा' सुगावा प्रकाशन , पुणे